संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# कष्टाच्या कमाईवर पंधरा हजार कोटींचा भूर्दंड

**आपण** कितीही कष्टाने पैसा कमावला तरी त्याला अनेक पध्दतीने पाय फुटत असतात किंवा वेगवेगळ्या करांमधून कमावलेल्या पैशातला बराचसा भाग सरकारी यंत्रणांना किंवा खाजगी एजंटांना मिळत असतो. केंद्र सरकारने अलिकडेच थोडीशी करमर्यादा वाढवल्याबरोबर पगारदार नोकरांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले एवढेच नव्हे तर केंद्र सरकार जीएसटीचा दर कमी करणार म्हटल्यावर व्यापारी वर्गही खुश होणार होता. परंतु यातली नेमकी सवलत कशी आणि किती आहे हे अजूनही स्पष्ट झालेले नाही. परंतु कोणत्याही प्रकारची करसवलत सामान्य माणसांना दिलासा देणारी वाटत असते. तीच परिस्थिती जागतिक पातळीवर आहे. भारतातील बराच मोठा वर्ग जगाच्या अनेक भागामध्ये नोकरी उद्योग, व्यवसायाच्यानिमित्ताने राहात असतो आणि वर्षभरातून अनेकवेळेला तो आपल्या घरी किंवा कुटुंबीयांसाठी पैसे पाठवत असतो. एका अलिकडे केल्या गेलेल्या सर्वेक्षणामध्ये परदेशस्थ भारतीयांकडून दरवर्षी साधारणपणे आपापल्या कुटुंबीयांना दोन लाख कोटींची रक्कम रवाना होत असते. आणि त्यातला धक्कादायक भाग असा आहे की ही रक्कम पाठवताना त्यांना भरावे लागणारे वेगवेगळे कर किंवा रक्कम पाठवताना जे काही हस्तांतरण शुल्क द्यावे लागते. त्यापैकी तब्बल पंधरा हजार कोटींचा भूर्दंड या लोकांना सोसावा लागतो. म्हणजे कष्टाने पैसा कमावूनही तो घराकडे पाठवताना वेगवेगळ्या कारणांपोटी आपल्या कमाईतला बराच मोठा भाग या करांच्या माध्यमातून सोडून द्यावा लागतो. यासंदर्भात अनेकवेळेला त्या त्या ठिकाणच्या भारतीयांनी तक्रारीही केल्या आहेत आणि अशा प्रकारचे हस्तांतरण शुल्क कमी केले जावे परंतु त्याकडे गंभीरपणे लक्ष दिले गेले नाही. हा पैसा सरकारी यंत्रणांच्या तिजोरीत जरी जात असला तरी त्याचे प्रमाण इतके अवाढव्य आहे की, एवढा मोठा भूर्दंड कशासाठी लोकांनी सहन करायचा असाच प्रश्न निर्माण होतो. कारण या कमाईवर आयकर भरावा लागतो. आयकराशिवाय केवळ पैसे पाठवण्याच्या मोबदल्यात घेतले जाणारे शुल्क निश्चितच अन्यायकारक ठरते. आतापर्यंत या शुल्काचे इतक्या अधिकृतपणे मोजमाप झालेले नव्हते. त्यातून हा जो आकडा समोर आला आहे तो मात्र या पैसे पाठवणाऱ्यांचीही झोप उडवणारा ठरतो.

### अवाजवी हस्तांतरण शुल्क

सर्वाधिक पैसा हा आखाती देश त्याबरोबरच अमेरिका, इंग्लंड, जपान आणि त्याखालोखाल चीनमधून भारतात पाठवला जातो. परदेशात काम करणाऱ्यांचे पगार प्रचंड असतात. परंतु ते भारतीय रुपयाच्या तुलनेमध्ये त्याचे मूल्य नेहमीच जास्त असते. परदेशातून पाठवला जाणारा पैसा त्या त्याठिकाणी असणाऱ्या भारतीय बँका तसेच आंतरराष्ट्रीय बँकांच्या माध्यमातून रवाना होतो. परंतु त्याची शुल्क आकारणी त्या त्या देशातील चलनाप्रमाणे केली जाते. म्हणूनच पैसे पाठवणाऱ्याला ज्यादा भूर्दंड सोसावा लागतो. विशेष म्हणजे अनेक भारतीयांना वर्षातून अनेकवेळा पैसे पाठवण्याची वेळ येते. प्रत्येकवेळी हे शुल्क वेगवेगळ्या पध्दतीने देण्याची वेळ येते. एवढेच नव्हे तर अनेकवेळेला वेगवेगळी कारणे सांगून किंवा नियम सांगून ही शुल्क वसुली होत राहाते. या हस्तांतरण शुल्काच्या अन्याय वसुलीच्याविरोधात तक्रारी जरी झाल्या असल्या तरी त्यावरची उपाययोजना का केली जात नाही. हा एक मोठा आश्चर्याचा भाग ठरतो. यातला थोडा जरी भाग वाचवता आला तरी भारतीयांना त्यांच्या नातेवाईकांकडून मिळणाऱ्या रकमेत वाढही होऊ शकेल. खरे तर केंद्र सरकारने याबाबत स्वतः पुढाकार घेऊन या हस्तांतरण शुल्काबाबत प्रयत्न करायला हवेत कारण त्या त्या देशात हे उत्पन्न मिळत असताना तिथल्या दराप्रमाणे त्यांना आयकर भरावा लागतो. शिवाय इतरही कर बरेच मोठे असल्याने त्यातूनही त्यांची सुटका होत नसते. अशावेळी उरल्या सुरल्या पैशातून घरी किंवा कुटुंबियांना पाठवल्या जाणाऱ्या रकमेसाठी द्यावे लागणारे शुल्कही कमी होत नसेल तर त्यासंदर्भात उपाययोजना होणे. निश्चितच संबंधितांना दिलासा देणारे ठरू शकेल. सर्वसाधारणपणे अशी समजूत असते की परदेशात काम करणारे गडगंज पैसा कमावतात. पण त्याची भारतीय रुपयात मोजदाद केली की रक्कम वाढते. तिथल्या देशाच्या चलनानुसार ती जवळपास आपल्यासारखीच ठरते. त्यातून वाचलेला पैसा तिथे काम करणारा सर्वसाधारण माणूस आपल्या कुटुंबासाठी पाठवत असतो हे लक्षात घेतले पाहिजे.

### ही तर सक्तीची शिक्षाच

यासंदर्भात यापूर्वी जी २० देशांच्या परिषदेमध्येही मुद्दाम आणला गेला होता. पण निश्चित निर्णय होऊ शकला नाही. या क्षेत्रातल्या अभ्यासकांच्या आणि तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार हे शुल्क अवाढव्य आहे. त्याबाबत कपात करता येऊ शकते. किंबहुना त्याचा पाठपुरावा त्याप्रमाणेच व्हायला हवा. गेल्या काही वर्षात भारताची परकीय गंगाजळी वाढण्यासाठी या परदेशस्थ भारतीयांचे मोठे योगदान आहे. परकीय चलनामध्ये येणारा हा पैसा सरकारसाठी निश्चितच महत्वाचा ठरतो. परंतु तो येत असताना केवळ स्थानिक संस्थांच्या शुल्कापोटी आपल्याच देशातील लोकांना एवढी मोठी रक्कम गमवावी लागते. इकडे दुर्लक्ष करता येणार नाही. उलट एका विशिष्ट किमान शुल्क रचनेत हा पैसा तातडीने त्यांना पाठवता आला पाहिजे. या वाढत्या शुल्कामुळेसुध्दा त्यांच्या पैसे पाठवण्याच्या व्यवहारांवरही मर्यादा येऊ लागल्या आहेत. परदेशातला भारतीयांचा जास्तीत जास्त पैसा देशात येऊ द्यायचा असेल तर त्यांच्यावर असलेली ही शुल्क आकारणीची टांगती तलवार काढून टाकावी लागेल. खरे तर हा भूर्दंडही म्हणता येणार नाही. आपल्याच कष्टाचा पैसा आपल्याच नातेवाईकांना पाठवण्याकरीता त्या भारतीयांना सोसावी लागणारी सक्तीची शिक्षा आहे असेच त्याचे वर्णन करावे लागेल. पंधरा हजारकोटीचा हा अंदाज ढोबळ असून तो यापेक्षाही अधिक होण्याची शक्यता याच्याशीच संबंधित यंत्रणांनी व्यक्त केली आहे.